**विषय :-** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सेवा प्रवेश निमामध्ये सुधारणा करण्याबाबत.

**प्रस्तावना**

उपरोक्त विषयान्वंये महानगरपालिका स्तरिय सुधारित कर्मचारी सेवाप्रवेश नियमावली यांस मान्यता मिळणेकामी महानगरपालिका प्रशासनाने वेळोवेळी राज्य शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. भिनिम-२०२२/प्र.क्र.९४/नवि-२३ दि. १४.१२.२०२२ नुसार महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५७ (३) अनुसार शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रारूप सेवाप्रवेश नियमामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२२ या नियमास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५४, ४५५, ४५६, ४५७ (३) व ४६५ अन्वये शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापी सन्मा. पदाधिकारी, लोकप्रतीनिधी, कर्मचारी संघटना व कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे तक्रारी व विनंती नुसार घेतलेल्या हरकतीप्रमाणे एकुण १७ पदांमधील आवश्यक दुरुस्तीकामी प्रस्ताव शासनास या कार्यालयाकडील जा.क्र./भिनिशमनपा/आस्थापना/३०४२/२०२३ दि. १३/०९/२०२३ अन्वये पाठवण्यात आलेला होता. तदनंतर उक्त सादर करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार प्रशासकीय ठराव क्र. २८१ दि. २५/१०/२०२३ शासनास सादर करण्यात आलेला होता.

सदर दुरूस्तीकामी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने दुरुस्ती/सुधारणा करण्याच्या अनुषंगाने सविस्तर कारणमिमांसा, अशा प्रकारची दुरुस्ती करण्याची आवश्यकता, प्रशासनाच्या सोईच्या दृष्टिने असणारी गरज, या बाबत आस्थापना विभागाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय इत्यादी बाबीसह सविस्तर अहवाल सादर करणेबाबत मा. अवर सचिव, नगर विकास विभाग यांचे पत्र प्राप्त झाले होते. त्याअनुषंगाने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा प्रस्ताव या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र./भिनिशमनपा/आस्थापना/६१२/२०२४ दि. २१/०२/२०२४ व प्रशासकीय ठराव क्र. ३६६ दि. २१/०२/२०२४ अन्वये वरिष्ठ लिपीक व लिपीक या संवर्गामध्ये आवश्यकत्या दुरूस्ती करून प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला होता.

सदर प्रशासकीय ठराव क्र. २८१ व प्रशासकीय ठराव क्र. ३६६ मध्ये या दोन्ही प्रशासकीय ठरावामध्ये विसंगत आढळून आल्याने संदर्भ क्र. ७ अन्वये मा. अवर सचिव, नवि-२३ यांच्या प्रत्रातील परिच्छेद क्र. २ मध्ये सदर प्रकरणी सेवा प्रवेश नियमामध्ये आवश्यक असणारे बदल/दुरुस्ती/सुधारण प्रथमत: महानगरपालिका स्तरावर सुनिश्चित करून माहिती सादर करणेबाबत कळविले होते. त्यानुसार लोकप्रतिनिधी व कर्मचारी संघटना यांचे मागणीनुसार व या कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रशासकीय ठराव क्र. ३६६ दि. २१/०२/२०२४ हा विखंडित करून प्रशासकीय ठाराव क्र. २८१ दि. २५/१०/२०२३ रोजीचा ठराव कायम करून त्यानुसार सेवाशर्तीमध्ये दुरूस्ती करून मिळणेकामी मा. उप सचिव यांना संदर्भ क्र. ८ अन्वये कळविण्यात आलेले होते.

मात्र महानगरपालिका अधिनियमातील सन १९४९ मध्ये अनुसूची मधील, प्रकरण २ महानगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती, इत्यादीचे कामकाज मध्ये १. (र) नुसार प्रशासकीय ठराव क्र. ३६६ विखंडित करून प्रशासकीय ठराव क्र. २८१ नुसार दुरूस्ती करणेकामी दुरुस्तीकामी पाठवण्यिात आलेल्या प्रस्तावास सद्य:स्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च कलम ४५२ अ (१) नुसार प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्रमांक** ६९० **दिनांक** २८/११ **/२०२४**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा मंजूर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२२ मध्ये सुधारणा करणेकामी सादर करण्यात आलेला प्रशासकीय ठराव क्र. २८१ दि. २५/१०/२०२३ व प्रशासकीय ठराव क्र. ३६६ दि. २१/०२/२०२४ मध्ये या दोन्ही प्रशासकीय ठरावामध्ये विसंगत असल्याने सद्य:स्थितीत मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र. ७१ (भाग-१) नवि-१४, दि. ०६/०६/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च कलम ४५२ अ (१) तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निमामपूर शहर महानगरपालिका याद्वारे ठराव क्र. ३६६ दि. २१/०२/२०२४ विखंडित करण्यास मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**



जनरल-२